माहितीचा अधिकार

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

जा. क्र.: विकाअ/आस्था/२०२५/1541 दिनांक :- 30 MAY 2025

**कार्यालयीन आदेश -**

संदर्भ :- उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, शा.नि.क्र. जीईसी-3396/(7376)/तांशि-1 दि.10.04.1997

उक्त संदर्भान्वये प्र.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्था/कार्यालयातील गट-ड पदावर कार्यरत खालील कर्मचाऱ्यांची स्तंभ क्रमांक§३ नुसार विभागांतर्गत प्रशासकीय बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव व पदनाम आणि सद्याचे कार्यरत ठिकाण | बदली नंतर पदस्थापनेचे ठिकाण | बदलीचे कारण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) | श्री. किशोर अनिल रोडगे,<br>हमाल,<br>शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम<br>येथे रिक्त असलेल्या पदावर | प्रशासकीय बदली |
| २) | श्री. रविंद्र अंबादास सोनोने,<br>हमाल,<br>तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती | शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तिजापूर<br>येथे रिक्त असलेल्या पदावर | प्रशासकीय बदली |

सदर बदली आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता सर्व संस्था/कार्यालय प्रमुख यांनी खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(१) बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यावर सर्व संस्था/कार्यालय प्रमुखांनी बदली झालेल्या कर्मचाऱ्यांस तात्काळ कार्यमुक्त करावे.

(२) बदली झालेले कर्मचारी त्यांच्या पूर्वीच्या पदस्थापनेच्या ठिकाणाहून कार्यमुक्त होवून रुजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजू करुन घ्यावे. एखाद्या कर्मचाऱ्यास रुजू करुन न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतिक्षा काळ ठरवून काम न देता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित संस्था/कार्यालय प्रमुखास जबाबदार धरण्यात येईल.

(३) उपरोक्त कर्मचाऱ्यांनी बदली करण्यात आलेल्या संस्थेत / कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे. संबंधीत कर्मचारी बदलीच्या ठिकाणी कर्तव्यार्थ हजर होण्याकरीता नियमानूसार प्रवास खर्च / पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहिल.

(मनोज म. अंधारे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रति,

संबंधीत कर्मचारी (संबंधित संस्था / कार्यालय प्रमुखांमार्फत)

प्रतिलिपी :- <u>माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.</u>

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.(कार्यासन क्र.१२)
२. प्र.प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती
३. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, अमरावती / वाशिम / मुर्तिजापूर यांना मानार्थ सादर.
(संबंधीत संस्था / कार्यालय प्रमुखांमार्फत)
४. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने, अमरावती / वाशिम / मुर्तिजापूर
५. गोपनिय विभाग, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
६. निवड नस्ती.